Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed


Multidisciplinary International Research Journal

April - 2023

ISSUE No - (CDVII) 407







Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

April -2023

ISSUE No - (CDVII) 407







Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

INDEX

No.	Title of the Paper	Authors' Name	Page No.
1	Dalit Literature and Translation	Mr. Shuddhodhan P. Kamble	1
2	A Comparative Analysis Of Geographical Indication Between India And United States	Ms. Shilpa Ram Rathod	3
3	Unveiling the Diverse Male Personalities in Jaishree Misra's Novel ' A Scandalous Secret'	Ajay Madhukarrao Kalmegh	9
4	Economic Ideology of Pandit Jawaharlal Nehru	Prof. Dr. Vijay Dalpatrao Kapse	13
5	Digital Transformation In Finance: Challenges And Future In India	Dr. Patil Bhagwan Shankar	16
6	Green Supply Chain Management	Dr. Sou. Parvati B. Patil	20
7	Urban Expansion and Its Consequences: A Case Study of Chandla Town, Bundelkhand, Madhya Pradesh	Vaseem Ahmad	25
8	New Education Policy: A need of hoursand nor mere an issue	S.S.Arsad	31
9	A Conceptual Review of Literature on Rural-Urban Fringe: A Link with Bilaspur City, Chhattisgarh	Hari Shankar Kumar	33
10	A Study On Financial Performance Of Private Sector Banks On The Basis Of Profitability Analysis.	Dr. Madhavi Mahesh Nighoskar	41
11	A Critical Assessment Of The Election Laws In India	Dr. Mahendra Pachadkar	48
12	Consumer's Demographic Features as contiributors to Hedonic Motivation.	Shreya Gawande	53
13	भारत में चुनाव सुधार और सशक्त होता लोकतांत्रिक व्यवस्था	आशीष कुमार सिंह	56
14	आदिवासींचे भारतीय स्वतंत्रता आंदोलनातील योगदान एक - ऐतिहासिक अवलोकन	प्रा. डॉ. मस्के नारायण कारभारी	59
15	राज्यशास्त्राचा जनक ?रिस्टॉटल : एक चिंतन	प्रा.डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे	63
16	क्रिप्टो करेंसी	डॉ . विद्या चन्ने	67
17	बापूसाहेब राजभोज आणि काळाराम मंदिर सत्याग्रह	प्रा. डॉ. किशोर कोंड्बाजी काजळे	72
18	स्क्रिझोफेनिया आजार : समज-गैरसमज आणि उपचार	डॉ. विजयता एम. विटनकर	83
19	जातीसंस्था आणि सामाजिक अशांतता	प्रा. डॉ. संजय जे. भगत	88
20	संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील स्त्रियांचे योगदान	प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम	91

21	प्राचीन काळातील बारव : कला व स्थापत्य : एक ऐतिहासिक अभ्यास प्रा. डॉ. भोसले मृणाल गुलाबराव	95
22	भारतीय निवडणूक व्यवस्थेमधील दोष व त्यावरील उपायांचे विश्लेषणात्मक अध्ययन कु.स्वाती युगेद्र अंबळकार , डॉ.संगीता भांगडिया (मालाणी)	98
23	साठोत्तरी मराठी काव्यविचार : एक दृष्टीक्षेप १९६० ते १९९० डॉ. आर. बी साखरकर	104
24	अमरावती शहरातील अंतरानुसार रस्ते मार्गाच्या सुगमतेचे भौगोलिक अध्ययन प्रा. दिपक उदयराज अंबोरे	112
25	लोकशाहीतील प्रसार माध्यमांची बदलती भूमिका डॉ.संगीता भांगडिया मालानी	117
26	सातवाहनाचे महाराष्ट्रातील राजकीय, आर्थिक व सांस्कृतीक योगदान – प्रा.डॉ. बोचरे जे. एम.	124
27	कोकणातील 'दशावतार' : मराठी नाटयसृष्टीची गौरवशाली परंपरा प्रा. डॉ. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने	127
28	स्त्रिया आणि माध्यमे डॉ. सुवर्णा देविदासराव जवंजाळ	131
29	वातविकाराची कारणे व त्यावरील उपाय प्रा. डॉ. विद्या मुकुंद ठवकर	134

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVII) 407
ISSN : 2278-9308
April, 2023

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील स्त्रियांचे योगदान

प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम
इतिहास विभाग बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे.
ईमेल - kadamcv.78@gmail.com मो.नं. 9527797686

प्रास्ताविक -

महाराष्ट्राला गौरवशाली ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात स्वराज्याची निर्मिती केली. स्वराज्याच्या निर्मितीतून त्यांनी रयतेमध्ये स्वराज्य, स्वधर्म, भाषा व संस्कृती याविषयी जागृती घडवून आणली. त्यामुळे मराठी माणसात अस्मिता निर्माण झाली. इसवी सन १८१८ मध्ये तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धाने मराठा सत्तेचा शेवट होऊन ब्रिटिशांची सत्ता महाराष्ट्रात प्रस्थापित झाली. ब्रिटिश काळात धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक जागृती होऊन राष्ट्रवादीची भावना वाढीस लागली. पुढे इसवी सन १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भाषावार प्रांतरचनेची मागणी वाढीस लागली. परंतु महाराष्ट्रात ही मराठी भाषिक राज्याची मागणी करणारी संयुक्त महाराष्ट्र चळवळ इसवी सन १९४६ पासून सुरू झाली. १२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे साहित्य संमेलन भरले असता त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर भर देण्यात आला. पुढे २८ जुलै १९४६ रोजी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली. अनेक स्थित्यंतरातून या चळवळीची वाटचाल झाली. यातून ०१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य भाषावर प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार अस्तित्वात आले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा इतिहास लक्षात घेता जवळपास १०५ हुतात्म्यांना आपल्या प्राणाचे बलिदान द्यावे लागले. या हुतात्म्यांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिलांचाही समावेश होतो. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या परिप्रेक्ष्यातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील महिलांच्या योगदानाचा ऊहापोह केलेला आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे

१) संयुक्त महाराष्ट्र चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.

२) संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील स्त्रियांचे कृती कार्यक्रम अधोरेखित करणे.

३) संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील महिला शाहिरांचे वैचारिक योगदान अभ्यासणे.

४) स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या परिप्रेक्ष्यातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील स्त्रियांच्या योगदानाची दखल घेणे.

शोधनिबंधाची गृहितके -

१) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील व्यापक जनचळवळ म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळ होय.

२) संयुक्त महाराष्ट्र चळवळीत स्त्रियांनी अभूतपूर्व असे योगदान दिले.

३) संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील महिला शाहिरांचे साहित्यिक योगदान अत्यंत महत्त्वाचे होते.

४) संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सर्व विचारधारांच्या महिला आघाडीवर होत्या.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी –

यशवंतराव चव्हाण आपल्या 'ऋणानुबंध' मध्ये लिहितात की, "मराठी भाषिकांच्या एकीकरणाची ओढ साहित्य संमेलनातून निर्माण झाली. १९०८ च्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात चिंतामणराव वैद्य यांनी एकीकरणाचा उल्लेख प्रथम केला",[१] त्यानंतर १९११ साली इंग्रज सरकारने बंगालची फाळणी रद्द केली. त्यासंदर्भात भाषा व राष्ट्रीयत्व या शिर्षकाखाली केसरी मध्ये न. चिं. केळकर यांनी लिहिले की, मराठी भाषा बोलणाऱ्यांनी सर्व लोकसंख्या एका अमलाखाली असावी. तसेच लोकमान्य टिळकांनी १९१५ साली भाषावार प्रांतरचनेची मागणी केली होती. १९३८ च्या अखेरीस मुंबई येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात मागणी करण्यात आली की, वऱ्हाडसह महाराष्ट्राचा एकभाषी प्रांत बनवावा आणि पुढे निजाम व पोर्तुगीज यांची सत्ता नष्ट झाल्यावर मराठवाडा आणि गोवा हे प्रदेश सामील करावेत. सन १९३९ च्या नगर येथील साहित्य संमेलनात ठराव पास झाला की, सर्व मराठी भाषा प्रदेशांचा मिळून एक प्रांत बनवावा आणि त्याला संयुक्त महाराष्ट्र असे नाव द्यावे. अशा प्रकारे सर्व मराठी भाषा

बोलणाऱ्या लोकांचे भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाच्या आधारावर एक राज्य स्थापन करण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनाला संयुक्त महाराष्ट्र आंदोलन किंवा चळवळ असे म्हटले जाते. या चळवळीमुळे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा बोलणारे मुंबई, कोकण, देश, विदर्भ, मराठवाडा, खानदेश व अजूनही महाराष्ट्राबाहेरच असलेले डांग, बेळगाव, निपाणी कारवार व विदर हे भाग अभिप्रेत होते. साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक, राजकीय या सर्व अंगांनी ही चळवळ उभी राहिली होती.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील स्त्रियांचे योगदान

१० ऑक्टोबर १९५५ रोजी पुनर्रचना आयोगाने द्विभाषक विशाल मुंबई राज्याची घोषणा केली. त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. मुंबईत कामगार आणि मध्यमवर्ग अन्यायाच्या जाणीवेने रस्त्यावर उतरला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अनेकांनी योगदान दिले. मुंबईसह राज्यातील विविध भागांमध्ये विशेषतः सीमा भागात संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन जोमाने सुरू होते. आचार्य अत्रे, सेनापती बापट, कॉम्रेड श्रीपाद डांगे, एस.एम. जोशी, प्रबोधनकार ठाकरे, दादासाहेब गायकवाड, आदींसह अनेक दिग्गजांच्या नेतृत्वात चळवळ सुरू होती. या चळवळीत महिलांचाही लक्षणीय सहभाग होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये १०५ हुतात्म्यांमध्ये महिलाही हुतात्मा झाल्या. या लढ्यात सर्व जाती धर्माच्या, पंथाच्या, श्रीमंत, गरीब, कष्टकरी उच्चविद्याविभूषित ते निरक्षर अशा सर्वच पार्श्वभूमीतील महिलांचे योगदान होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या रणरागिनी म्हणून कम्युनिस्ट नेत्या अहिल्या रांगणेकर यांचा उल्लेख केला जात असे. आचार्य अत्रे यांनी अहिल्या रांगणेकर यांच्यावर कविता रचत त्यांना रणरागिणी असे संबोधले होते. महिलांना मोठ्या प्रमाणावर आंदोलनात उतरवण्याचा वाटा अहिल्या रांगणेकर यांचा होता. त्याबरोबरच ऐतिहासिक वारली आदिवासी उठावाच्या नेत्या गोदावरी परुळेकर यांच्या नेतृत्वात तलासरी, उंबरगाव, डांग, आदी गुजरात सीमेवरील भागात संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन करण्यात आले. कॉम्रेड गोदावरी परुळेकर यांच्यामुळे आदिवासींनी देखील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. कॉम्रेड तारा रेड्डी, कॉम्रेड अहिल्या रांगणेकर यांनी गिरणगाव व मुंबईतील विविध भागांमधील महिलांना आंदोलनात उतरवले. सत्याग्रह, घेराव, आदींमध्ये त्यांचा सहभाग लक्षणीय होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भिमाबाई दंगट या दान आणि समाजकार्यात आघाडीवर होत्या. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला आर्थिक मदत म्हणून त्यांनी अंगावरचे दागिने काढून दिले होते. भीमा दांगट यांनी यशवंतराव चव्हाणांसह इतर नेत्यांना जनतेची प्रतिक्रिया तीव्र कृतीतून दाखवून दिलेली होती. त्याचबरोबर मालतीबाई परांजपे या शिक्षण मंडळावर होत्या. त्यांनीही या लढ्यात सक्रिय सहभाग घेतला. कोंडाबाई सावंत यांचाही सक्रिय सहभाग होता. सर्वच जातीपातीच्या आणि आर्थिक, सामाजिक स्तरातील महिला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी आघाडीवर होत्या.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीची महिला समिती -

विविध विचारसरणीला मानणाऱ्या महिला या समितीमध्ये केवळ महाराष्ट्र प्रेमापोटी एकत्रित आल्या होत्या. त्यात जनसंघाच्या मीराताई पावगी, मालती परांजपे, सुशीला आठवले, शालिनी कुलकर्णी, हिंदू महासभेच्या शांता गोखले, कम्युनिस्ट विचारसरणीच्या अहिल्या रांगणेकर, तारा रेड्डी, गोदावरी परुळेकर, अनु लिमये, कुसुम रणदिवे, प्रजा समाजवादी पक्षाच्या प्रमिला दंडवते, यांच्यासोबतच समाजातील सर्वच सरातील महिला या लढ्यात उतरल्या होत्या. शैला पेंडसे, सुमन संजगिरी, प्रमोदिनी तारा शेट्ट्ये, मालिनी तुळपुळे, कमल भागवत, सुनंदा देसाई, निर्मला कुलकर्णी, पुष्पा त्रिलोकेकर, शालिनी राऊत, अनुसया लिमये, प्रेमा पुरव, अवाबेने देशपांडे, जिर्जा देशमुख, पार्वतीबाई भोर, यशोदा माडीवाले इ. या लढ्यामध्ये लेखिका दुर्गाबाई भागवत आणि इस्मत चुगताई यांचेही मोलाचे योगदान होते. या स्त्रिया खानावळी चालवणे, तुरुंगात डांबलेल्या लोकांसाठी भोजनगृहे चालविणे हे काम करत असत. तर काही शिकलेल्या गृहिणी न्यायालयात कचेरीत जात. नव्याने कोणावर गुन्हा दाखल झालेला आहे का, तुरुंगात डांबलेले आहे का, याची यादी तयार करत. या यादीनुसार त्यांना मदत पुरवण्याची कार्यवाही या महिला करत असत.तारा रेड्डी यांचा नेतृत्वाखाली महिलांची तुकडी गोळीबार लाठीमाराला तोंड देत पुढे आली. यात कामगार व मध्यमवर्गातील शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या. मालती नगरकर, बायजी पाटील, यामिनी चौधरी, पार्वतीबाई भोर, इंदुताई कुलकर्णी,

गिरीजा कदम, मनोरमा हंगल यांनी सत्याग्रह केले. आपल्या संयुक्त समाजवादी पक्षाचा सत्याग्रहात भाग न घेण्याचा आदेश धुडकावून प्रमिला दंडवते यांच्या तुकडीने सत्याग्रहात भाग घेतला.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील महिला शाहिरांची भूमिका –

फाजल अली कमिशनच्या शिफारसीनुसार भारत सरकारने मराठी व गुजराती भाषिक प्रदेशांचे द्वैभाषिक मुंबई राज्य निर्माण केले. त्यामुळे देशातील मराठी व गुजराती भाषिक सोडून इतर सर्वांना भाषिक राज्य मिळाले. तर मराठी भाषिक लोकांची मुंबईसह मराठी भाषिक प्रदेशाचे संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण करावे अशी मागणी होती. ती मागणी नाकारून केंद्र सरकारने मराठी भाषिकांवर अन्याय केला. तेव्हा हा अन्याय दूर करून मराठी भाषिक प्रदेशाच्या महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी मराठी लोकांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ चालविली. त्यात विचारवंत, लेखक, साहित्यिक, नेते, शाहीर इत्यादी बरोबरच सामान्य स्त्री पुरुषही मोठ्या प्रमाणात चळवळीत सहभागी झाले. प्राणपणाने लढले. त्यात महिला शाहीरही सक्रिय होत्या. अशा महिला शाहिरांमध्ये इंद्रायणी पाटील, अनुसयाबाई आनंदराव शिंदे, लल्लूताई म्हापनकर, कुसुमताई गायकवाड, जैनू चांद, अशा बोटावर मोजण्याइतकी महिलांची संख्या असली तरी त्यांनी चळवळीचे विचार लोकांपर्यंत पोहोचवून त्यांना चळवळीत सहभागी होण्यास लढण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे स्त्रियांचा सहभाग वाढू लागला. परिणामी चळवळीची व्याप्तीत वाढ होऊन ती प्रभावी झाली आणि संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती जवळ आली. संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना होऊन तिच्या नेतृत्वात मराठी भाषेकांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ चालविली. त्यानुसार "चळवळीतील विचारवंत, नेत्यांचे विचार जनतेपर्यंत पोहोचविण्यात शाहीरांनी जागल्याची भूमिका घेतली. 'जागा मराठा आम जमाना बदलेगा' अशी डरकाळी फोडणाऱ्या शाहिरांनी संयुक्त महाराष्ट्राचा लढा तेवत ठेवला."[२] महिला शाहिरांनी महाराष्ट्रभर फिरून चळवळीचा प्रसार केला. सत्याग्रह, मोर्चे, परिषदा इत्यादी ठिकाणी महिला अनेक स्फूर्तीदायक गाणी म्हणत. लोकजागृतीसाठी गावोगावी फिरुन शाहिरीचे कार्यक्रम करणाऱ्या परभणी जिल्ह्यातील कळमनुरीच्या अनुसयाबाई आनंदराव शिंदे, नाशिक जिल्ह्यातील मनमाडच्या कुसुमताई माधवराव गायकवाड आणि मुंबईच्या इंद्रायणी आत्माराम पाटील यांच्या समर्थनाला तोड नाही. आपल्या शीघ्र कवित्वाच्या जोरावर मुंबईतील लिलूताई म्हापनकरांनी अंगाई गीतांपासून ते स्फूर्ती गीते रचून संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन घराघरात पोहोचविले होते. लिलुताई म्हापनकर विविध पक्ष मिळून बनलेल्या समितीला प्रसंगी ठणकावून सांगताना म्हणतात, "तीळ तीळ तुम्ही प्रेमची जोडा। अहंकार द्वेषही सोडा। तन मन धन अर्पूनी समितीची, एकजूट आपली ठेवा॥."[३]

असे सांगून समितीस संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत एक राहण्यास त्यांनी भाग पाडले. लहान वयापासून इंद्रायणी पाटील संयुक्त महाराष्ट्रच्या सत्याग्रह चळवळीत सहभागी होत्या.

चळवळकर्त्या घरातच वाढलेल्या शाहीर अनुसयाबाई शिंदेंनी १६ - १७ व्या वर्षापासूनच देशाच्या स्वातंत्र्यासाठी डफावर थाप मारली त्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीपासून दूर राहणे शक्यच नव्हते. त्यामुळे या चळवळीत जनजागृती करणारी पहिली महिला शाहीर म्हणून त्या मान्यता पावल्या. त्यांच्या पोवाड्यांनी संयुक्त महाराष्ट्राबाबत जनजागृती होत असल्याने तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी त्यांना हदगाव तालुक्यातून हद्दपार केले. हद्दपारीनंतर त्यांनी हिंगोली, परभणी जिल्ह्यात कार्यक्रम केले. कार्यक्रम सादर करताना त्या म्हणत,

"एक पाय तुमच्या गावात।
दुसरा तुरुंगात किंवा स्वर्गात। तमा नाही याची अनुसयाला।
मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे।
त्याच्यासाठी वाणीचा दिवा चेतविला। जी...जी...॥" [४]

असे अनेक पोवाडे सादर करून चळवळीसाठी त्यांनी जनजागृती केली.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरू झाली तेव्हा विमलाबाई म्युनिसिपाल्टीच्या सदस्या होत्या. समितीच्या आदेशाप्रमाणे त्यांनी राजीनामा दिला आणि त्या सीमा सत्याग्रहात सहभागी झाल्या. कोल्हापुरातील महिला सत्याग्रहास विमलाबाईंनी सुरुवात केली. त्याचा पुष्कळ परिणाम झाला. कोल्हापूर येथे संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने महिला परिषद भरविण्यातही विमलाबाईंनी पुढाकार घेतला.

वीररसपूर्ण पोवाडे, ओव्या, पाळणे गाऊन त्यांनी जनजागृतीचे कार्य मोठ्या प्रमाणावर केले. कुसुमताई गायकवाड या चळवळीतील आणखी एक शाहीर. कुसुमताईंनी भायखळ्याच्या पार्टी ऑफिसमध्ये एक गट जमविला. तेव्हा शाहीर अमर शेखने त्यांना गाणी शिकविली. त्यामुळे शाहीर अमर शेख, अण्णाभाऊ साठे यांची गाणी त्या गाऊ लागल्या. बर्षभराने मनमाडला परतल्यानंतर त्यांनी पुन्हा शाहिरीचे कार्यक्रम करून लोकजागृती सुरू केली. महिला शाहिरांमधील आणखी एक महत्त्वाचे नाव म्हणजे लिलुताई म्हापनकर. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील सक्रिय सहभागाबरोबर संयुक्त महाराष्ट्र चवळीसाठी विविध सण व महिलांशी संबंधित अनेक प्रसंगी गाणी गाता यावी अशी संयुक्त महाराष्ट्र गीते त्यांनी रचली. लिलुताईंनी काव्यरचना केली तर शाहीर कुसुमताई गायकवाड यांनी १९५७ च्या निवडणुकीत समितीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी गावोगाव फिरून असंख्य शाहिरीचे कार्यक्रम केले. एवढेच नव्हे तर कलापथकाला मिळणाऱ्या बेगमीतून संयुक्त महाराष्ट्र प्रचारासाठी महाराष्ट्रभर खेडोपाडी कार्यक्रम केले. सत्याग्रहाच्या आधी शाहिरीचे कार्यक्रम सादर करून या महिला शाहीर जनतेमध्ये जोश निर्माण करण्याचे कार्य करीत असत.

महाराष्ट्राच्या विविध भागातून स्त्रिया आंदोलनात उतरल्या. कोल्हापुरात विमलाबाई बागल, वकुळाबाई खांडेकर, जयश्री साळुंखे, अंबुताई शिंदे, शकुंतला चौगुले, कमला तिवले, आशालता पाटील तसेच साताऱ्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या आई गोजराबाई आणि मुलगी हौसाबाई, हेमलता पाटील, कोंडाबाई, विठाबाई आणि हारुताई या सर्वांना अटक करून पोलिसांनी रात्री गावाच्या बाहेर सोडून दिले. कराडमध्ये मंगलाबाई पवार व सुपते गावातून शंभर बैलगाड्यातून ५०० - ६०० स्त्रियांनी मोर्चा काढला. यावेळी अंजली पाटील प्रेमला काकी चव्हाण, शालन पाटील यांची भाषणे झाली. दिल्लीत सत्याग्रहात २५० स्त्रिया आघाडीवर होत्या. याशिवाय अन्नपूर्णा भांडारकर, माई एरंडे, पार्वतीबाई वैद्य, कमल डोके, शांता रानडे, कमल भागवत, अंबुताई टिळेकर अशा अनेक लढाऊ स्त्रियांचे योगदान होते.

अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन हे स्वातंत्र्यानंतरची महाराष्ट्रातील व्यापक लोक समर्थन असणारी चळवळ होती. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासातील व महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळ हे राज्यातील पुरोगामी चळवळीचे सर्वात मोठे व्यापक आंदोलन होते. या चळवळीत महाराष्ट्रातील समाजातील सर्व स्तर एकत्र आले होते. या लढ्यामध्ये महाराष्ट्रातील विविध भागातील स्त्रियांनी मोलाचे योगदान दिले.

संदर्भ टिपा -

१) पाटील मनीषा रणरागिनी संयुक्त महाराष्ट्राच्या, दिशा पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती २० डिसेंबर २०१०. पृ. ४०

२) मांगले महेश, लढा संयुक्त महाराष्ट्राचा आणि सीमा प्रश्नाचा, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी, २०१४ पृ. १२५.

३) खोपकर कृष्णा, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि डाव्या पक्षांचे योगदान, जनशक्ती प्रकाशन, मुंबई, प्रथमावती, एप्रिल, २०१०, पृ. ६८.

४) आडारकर नीरा, मीना मेनन, कथा मुंबईच्या गिरणगावाची, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई, द्वितीयावृत्ती, २००९, पृ.६०.

५) फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड पाच, श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९७.

६) कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती २०१३.

७) पाटील व्ही. बी. महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास, के सागर प्रकाशन, तृतीयावृत्ती, २०१२.

८) य. दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सातवा, मौज प्रकाशन गृह, प्रथमावृत्ती, २००७.

९) राऊत गणेश, राऊत ज्योती, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, प्रथमावृत्ती, २००५.

१०) मासिक लोकराज्य एप्रिल मे २०११.

११) दैनिक महाराष्ट्र टाइम्स २ मे २०१०.